# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### मुंबई महापालिकेच्या के / पश्चिम विभागामध्ये अनधिकृत बांधकाम, फेरीवाले व तात्पुरत्या प्लास्टिकच्या झोपडया झाल्याबाबत

**(१) ८४१३ (०७-०४-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या के / पश्चिम विभागामध्ये अंधेरी स्टेशन रोड, जुहू जिमखाना, जूहू वर्सोवा लिंक रोड, भारत नगर येथील गॅरेज, मिठीबाई ते कुपर रुग्णालय, मेसडॉक इमारती बाहेर, सीझर रोड, गणेश नगर एन दत्ता मार्ग येथे अनधिकृत बांधकाम, फेरीवाले व तात्पुरत्या प्लॅस्टिकच्या झोपडया असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी मुंबई महापालिकेच्या के पश्चिम विभागामार्फत कारवाई करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, सदर ठिकाणच्या अनधिकृत बांधकामाचे निष्कासन न करणा-या महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागामध्ये अंधेरी स्टेशन रोड येथे अनधिकृत फेरीवाले असून, जुहू वर्सोवा लिंक रोड, मिठीबाई ते कुपर रुग्णालय, मॅस डॉक इमारतीबाहेर, सीझर रोड, गणेश नगर, एन. दत्ता मार्ग येथे कुठल्याही प्रकारचे अनधिकृत फेरीवाले नाहीत. जुहू वर्सोवा लिंक रोड येथे रोडवर प्लॅस्टिकच्या झोपड्या आहेत व जिल्हाधिकारी प्लॉटवर अनधिकृत झोपड्या तसेच भारत नगर येथे अनधिकृत गैरेजेस आहेत.

(२) व (३) होय. सदर भागातील अनधिकृत फेरीवाल्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागामार्फत मुंबई महापालिके अधिनियम १८८८ च्या कलम ४१५, ४१६ व ४८८ अन्वये उघडे व दुषित अन्न नष्ट करण्याची कारवाई करण्यात येते. तसेच सदर अनधिकृत फेरीवाल्यावंर मुंबई महापालिका अधिनियम १८८८ चया कलम ३१४(सी) अन्वये अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

सदर फेरीवाल्यांवर जानेवारी २०१५ मध्ये, दुषित अन्न नष्ट करणे, फेरीवाल्यांचे सामान उचलून नेणे, फेरीवाल्याचे प्लॅस्टिक शेड व अनधिकृत बांधकाम निष्कासित करणे अशी कारवाई बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे. तसेच गुलमोहर रोड (मिठीबाई कॉलेज) येथे दोन झुणका भाकर केंद्रे, त्यांना पर्यायी जागा देऊन निष्कासित करण्यात आली आहेत.

जुहू वर्सोवा रोडवरील प्लॅस्टिकच्या झोपड्या तसेच जिल्हाधिकारी प्लॉटवरील अनधिकृत झोपड्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते. तसेच भारत नगर येथील अनधिकृत गॅरेजना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महापालिका अधिनियमाच्या कलम ३५१ अन्वये दिनांक १३.९.२०१४ रोजी बजावण्यात आल्यानंतर दिनांक ०७.०३.२०१५ रोजी सदर ठिकाणी निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जागतिक बॅंक प्रकल्प योजनेच्या कोड क्र.०५१ बी.सी. एस.सी. प्रवर्गातून मालवणी (मुंबई) येथील भूखंड अर्जदारांना वितरीत करण्याबाबत.**

**(२) १३९४५ (०७-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक बॅंक प्रकल्प योजनेच्या कोड क्र.०५१ बी.सी. एस.सी. प्रवर्गातून मालवणी (मुंबई) येथील भूखंड अर्जदारांना वितरीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ जुलै, २०१२ रोजी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना पत्राद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप प्रश्न भाग १ मधील भूखंड अर्जदारांना वितरीत करण्यात न आल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, भुखंड वितरणाबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१६-०७-२०१५)** :(१) मा.लोकप्रतिनिधींनी दि.२४.०७.२०१२ रोजी वा त्या सुमारास म्हाडास दिलेल्या पत्राचा शोध जागतिक बॅंक प्रकल्प या कार्यालयातील अभिलेखात घेतला असता ते प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, ते उपलब्ध करण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधींना करण्यात येत आहे.

(२) व (३) मुंबई मंडळाच्या जागतिक बँक प्रकल्पांतर्गत ४५११७ निवासी भूखंडाबाबतच्या जाहिराती सन १९८४ ते १९९४ या कालावधीत देण्यात आलेल्या होत्या. सदर कालावधीमध्ये दिनांक ३१.०३.१९९५ पर्यंत ३५६९५ भूखंडांचा ताबा देण्यात आला.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०९.०३.१९९५ च्या आदेशान्वये status-quo देण्यात आल्यामुळे सन १९९५ ते २००३ या कालावधीमध्ये भूखंडाचा ताबा देण्याची कार्यवाही बंद करण्यात आली होती. तथापि, भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार चारकोप-IV, गोराई- III, वर्सोवा व मुलूंड येथील वसाहतीमधील क्षेत्र वगळल्यामुळे प्राधिकरणाच्या क्र. ५९७५, दि. १०.११.२००३ च्या ठरावानुसार उर्वरित भूखंडाचा ताबा देण्याची कार्यवाही सुरु करण्यात येऊन एकूण ४५११७ पैकी ३८२०७ भूखंडाचा ताबा देण्याची कार्यवाही पूर्ण झाली.

जागतिक बँक प्रकल्प योजनेच्या कोड क्र. ०५१ बी.सी.एस.सी. प्रवर्गातून मालवणी (मुंबई) येथील ३३१ अर्ज पोलीस निरीक्षक, पंतनगर, घाटकोपर, मुंबई, पोलीस ठाणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले असता पंतनगर पोलीस ठाण्याच्या अहवालानुसार सदर अर्जापैकी एकूण ३०४ अर्ज बनावट कागदपत्रासह म्हाडाला सादर केल्याचे निष्पन्न झाले. या १३ आरोपींविरुध्द मा.महानगर दंडाधिकारी, ३१ वे न्यायालय, विक्रोळी, मुंबई यांचे न्यायालयात खटला क्र. ९८२/पी/९७ दाखल करण्यात आलेला आहे.

दरम्यानच्या कालावधीत मा.मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्याकडील रिट याचिका क्र. ३३४६/२००४ मध्ये दि. ०६.१०.२००५ रोजी कांदळवन (Mangroves) पासुन ५० मिटर अंतरातील क्षेत्रामध्ये सर्व प्रकारच्या विकास कामास बंदी घातलेली आहे, सदर अंतरिम आदेशामुळे बाधित होणाऱ्या वरील नमुद प्रकल्पातील प्रस्तावांना अंतरिम स्थगितीच्या आदेशातून सुट मिळण्याकरीता पर्यावरण विभागाने दि. २९.०७.२०१३ रोजी दिलेल्या परवानगीनुसार मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, म्हाडा यांनी मा.उच्च न्यायालयात Notice of Motion दि. १२.१२.२०१४ रोजी दाखल केली असून, सद्य:स्थितीत म्हाडाच्या वकीलांनी प्रस्तूत प्रकरणी स्वयंस्पष्ट प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी २ आठवड्यांचा कालावधीत मागितल्यामुळे प्रकरण दि. १४.०७.२०१५ रोजी पुढील सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे होणारे अंतिम आदेश व पंतनगर पोलीस स्टेशन कडुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**ठिंबक संचाचे सन २०१३-१४ मधील अनुदान शेतक-यांच्या खात्यात जमा न झाल्याबाबत**

**(३) १३९४८ (०८-०४-२०१५). अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठिंबक संचाचे सन २०१३-१४ मधील अनुदान दिनांक १५ डिसेंबर, २०१४ पर्यंत शेतक-यांच्या खात्यात जमा करावे या कृषी आयुक्ताच्या आदेशाची अंमलबजावणी दीड महिन्यानंतरही न झाल्याने शेतक-यांची आर्थिक फरफट होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव शेतक-यांची आर्थिक कुंचबणा होत असल्याने शासनाने त्वरीत आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१५)** :(१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून सन २०१३-१४ या वर्षासाठी प्राप्त झालेला निधी सन २०१२-१३ मधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी वापरण्यात आल्याने सन २०१३-१४ साठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे सन २०१३-१४ मध्ये सुक्ष्म सिंचनाचे प्रस्ताव स्विकारण्यात आले नाहीत. तथापि, सन २०१३-१४ मध्ये ज्या शेतक-यांनी सुक्ष्म सिंचन संच बसविले त्यांचे प्रस्ताव स्विकारुन त्यांना अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांकडून प्रस्ताव स्विकारण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर शेतक-यांना लवकारात लवकर अनुदान वाटप करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोर्शी (ता.जि.अमरावती) येथील सोफिया औष्णिक वीज प्रकल्पाची जलवाहिनी फुटल्याबाबत**

**(४) १३९५४ (१०-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी (ता.जि.अमरावती) येथील सोफिया औष्णिक वीज प्रकल्पाची जलवाहिनी फुटल्यामुळे नजिकच्या पिंपळखुटा (मोठा) या गावात पाणी शिरले व हे पाणी तेथील उर्दू शाळेत शिरल्याने शाळेला सुट्टी देण्यात आली तसेच सदरील पाण्याने शेतातील पिकांचीही मोठी हानी झाली असल्याने गावकऱ्यांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपळखुटा मोठा या गावानजीकच्या जमिनीखालून सदरील जलवाहिनी गेली असून जलवाहिनीचे संभाव्य धोके ओळखून गावकऱ्यांनी त्यावेळी या जलवाहिनीला विरोध केला होता, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त कंपनीच्या संदर्भात शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०१५)** :(१) अंशतः खरे आहे.

तथापि जलवाहिनी फुटल्यामुळे शेती पिकांचे नुकसान झालेले नाही.

(२) नाही
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील गुरूकुंज मोझरी येथील शेतात तुरीच्या गंजीला शॉर्ट सर्कीटमुळे आग लागून झालेले नुकसान

**(५) १३९५५ (०८-०३-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील गुरूकुंज मोझरी येथील सीताराम भुरे यांच्या शेतात त्यांनी काढून ठेवलेल्या तुरीच्या गंजीला शॉर्ट सर्कीटमुळे आग लागून ६० हजार रूपयांची तूर खाक झाल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू शेतक-यांस आवश्यक ते सहाय/मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०४-२०१५) :**(१) होय, विद्युत निरीक्षक, निरीक्षक विभाग अमरावती यांच्या निर्देशानुसार सदर आग ही शॉर्ट सर्किटमुळे लागलेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील सौरदिव्या बाबत

**(६) १३९६१ (०८-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात जि.प.द्वारे ग्रामपंचायतीना सन २०१३ रोजी वा त्या सुमारास सौरदिवे देण्यात आले होते परंतू मध्यंतरीच्या काळात चोरटयांनी हे सौरदिवे काढून नेल्याने ग्रामस्थांना पुन्हा अंधाराचा सामना करावा लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकामध्ये लावावयाचे सदरहू सौरदिवे कमी उंचीवर असल्याने बॅटरी ठेवण्याकरिता असलेल्या लोखंडी व प्लास्टिकचे बॉक्स चोरटयांनी पळविले असून ग्रामस्थांची यामुळे होणारी गैरसोय पाहता शासन त्वरित आवश्यक कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यात सौर दिवे देण्यात आलेल्या ७८ ग्रामपंचायतीपैकी ५ ग्रामपंचायतीतील सौर दिवे चोरीस गेलेले आहेत.

(२) व (३) सौरपथ दिवे तांत्रिक मापदंडानुसार बसविण्यात आलेले आहेत. सौरपथ दिवे चोरीला गेल्याने संबंधित ग्रामपंचायतीने पोलीस स्टेशनला FIR दाखल केलेला आहे. तसेच जवळपासचे सौरपथ दिवे सुरु असल्याने ग्रामस्थांना अंधाराचा सामना करावा लागत नाही.

---

**बाघ (ता.जि.गोंदिया) नदीवर प्रस्तावित आंतरराज्यीय बंधा-याबाबत**

**(७) १३९७५ (०८-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्राम डांगोरली, (ता.जि.गोंदिया) मध्ये बाघ नदीवर बंधारा बांधण्याचे प्रस्तावीत आहे काय,

(२) बंधारा बांधण्यासाठी किती निधी अपेक्षित आहे,

(३) तसेच,बंधाराच्या बांधण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) तसेच, बंधाराच्या निर्माणाला अंतिम मंजूरीसाठी माननीय मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) आणि माननीय मुख्यमंत्री (मध्यप्रदेश) आंतरराज्यीय सिंचन प्राधिकरणाची बैठक घेणार आहे काय,

(५) उक्त बंधाराचा निर्माण झाल्याने किती कृषी क्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध होवू शकते?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :**(१) नाही. डांगुर्ली (ता.जि.गोंदिया) गांवाजवळ वैनगंगा नदीवर बॅरेज (बंधारा) बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(२) प्राथमिक अंदाजानुसार या बंधारा योजनेची किंमत सुमारे रु. २५० कोटी आहे.

(३) या बॅरेजकरिता सर्वेक्षणाचे व भु-तांत्रिक अन्वेषण चे काम पूर्ण झालेले आहे. पूर अभ्यास करण्यात आलेला आहे. या बॅरेजची सविस्तर संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना नाशिक कडून करण्यात येतील व त्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन योजनेची व्यवहार्यता तपासण्यात येईल.

(४) होय, नजीकच्या काळात आंतराज्यातील नियंत्रण मंडळाची 28 वी बैठक प्रस्तावित आहे. त्यात डांगुर्ली बॅरेज हे आंतराज्यीय प्रकल्प म्हणून घेण्याबाबत प्रस्ताव ठेवण्यात येईल.

(५) होय, बॅरेजद्वारे नविन सिंचनक्षेत्र निर्माण होणार नाही. तथापी बॅरेजद्वारे निर्माणहोणाऱ्या साठ्यामुळे डांगुर्ली उसिंयो (पूर्ण झालेली), तेढवा शिवनी उसिंयो (बांधकामाधीन), रजेगांव काटी उसिंयो (बांधकामाधीन) व देवरी नवेगांव उसिंयो (प्र.मा.प्राप्त) योजनांतर्गत ८९०१ हेक्टर सिंचन क्षेत्रास शाश्वत पाण्याचा स्त्रोत निर्माण होणार आहे.

---

**तळोदा (जि.नंदुरबार) येथे घनकचऱ्यामुळे होत असलेले प्रदूषण**

**(८) १३९८३ (०७-०४-२०१५). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा नगरपरिषद सध्या ज्या जागेवर घनकचरा साठवितात, त्या जागेचा घनकचऱ्याच्या प्रदुषणामुळे आजूबाजूच्या परिसराचे नागरिकरण ठप्प झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळोदा नगरपरिषदेने शासनाकडे पर्यायी जागेची मागणी केली आहे काय,

(३) असल्यास, पर्यायी जागा कोणती आहे व त्या जागेवर घनकचरा साठविण्यासाठी स्थलांतरण करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :**(१), (२) व (३) नाही. तथापि, सदर घनकचरा जागेच्या परिसरातील रहिवाशांना घनकचऱ्याच्या प्रदूषणामुळे दुर्गंधीचा वास येतो हे खरे आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी मौज चिनोदा व मौजे आमलाड शिवरातील जमिन मिळणे बाबत जि.नंदुरबार यांना प्रस्ताव सादर केला होता. तथापि, वरील दोन्ही ग्रामपंचायतींना ठराव करुन सदर जागा देण्यास विरोध दर्शविला आहे. पर्यायी जागा शोधण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नंदुरबार जिल्ह्यात ग्रामविकास योजनेअंतर्गत पाणीपुरवठा सुरु झाला नसल्याबाबत**

**(९) १३९८६ (०७-०४-२०१५). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत ग्रामविकास योजनेअंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात किती खेडेगावांना नळाद्वारे पाणी पुरवठा केला आहे तसेच बहुतेक गावांना पाणीपुरवठा सुरु झाल्याचे कागदोपत्री दाखवले आहे, परंतु अद्यापही पाणीपुरवठा सुरु झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, शासनाने सदर नळाद्वारे पाणीपुरवठा योजना सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
नंदुरबार जिल्ह्यात ग्रामविकास योजनेंतर्गत आतापर्यंत ८४७ पाणी पुरवठा योजना घेण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत सदरच्या गावांना संबंधित ग्रामपंचायतीमार्फत पाणी पुरवठा सुरु आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिक्षण शुल्क समितीकडे सिटीझन फोरम फॉर सॅनटीटी इन एज्युकेशनल सिस्टम संस्थेने केलेली मागणी**

**(१०) १३९८८ (०८-०४-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण शुल्क समिती, बांद्रा याचेकडे सिटीझन फोरम फॉर सॅनटीटी इन एज्युकेशनल सिस्टम या संस्थेने विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांची प्रतिज्ञापत्रावर तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीनंतर चौकशीसाठी पद्मभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन-चुनाभट्टी यांच्यासह तक्रारीत नमूद असलेल्या महाविद्यालयांना शिक्षण शुल्क समितीने भेटी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :**(१) होय.
(२) सदर बाबतीत शिक्षण शुल्क समितीकडे तक्रार प्राप्त झाली आहे. परंतु त्या तक्रारीनुसार शिक्षण शुल्क समितीने महाविद्यालयांना भेटी दिल्या नाहीत.
(३) पद्यभूषण वसंतदादा पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सायन, मुंबई या संस्थेतील त्रुटी अखिल भारतीय शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या निदर्शनास आणण्यासाठी संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सदर महाविद्यालयाच्या तक्रारीबाबत कुलसचिव, मुंबई विद्यापीठ व कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांना पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. तसेच या महाविद्यालयाला अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मुदतवाढ नाकारली आहे. त्याविरुध्दी संस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली आहे. सद्यःस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वसंतदादा पाटील सायन-चुनाभट्टी अभियांत्रिकी विद्यालयातील अनाधिकृत बांधकामाबाबत

**(११) १३९९३ (०७-०४-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पद्मभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठान, सायन-चुनाभट्टी व त्यांचे अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यावर अनधिकृत बांधकाम व शासनाची फसवणूक प्रकरणी वडाळा ट्रक टर्मिनल पोलीस स्थानक या ठिकाणी गुन्हा दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुन्ह्यांची चौकशी पूर्ण झाली आहे काय त्यात काय निष्पन्न झाले आहे, त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर बाबत परिमंडळ-४ अंतर्गत वडाळा टि.टि. पोलीस ठाणेस गुरक्र. ७०९/१४ कलम ४२०,४६४, ४६८, ३४ भादंवि दिनांक २७.१०.२०१४ रोजी दाखल असून नमुद गुन्ह्याचा तपास चालु आहे. प्रकरणी खोटी माहिती सादर करुन नमुद कॉलेजला मान्यता मिळविली हे निष्पन्न झालेले आहे. तसेच नमुद गुन्ह्यातील पाहिजे चारही आरोपीतांना मा.न्यायालयाने रुपये १०,०००/- लायक जामिनावर मुक्त केले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील मेहंदीबाग उड्डाणपूल, रामझुला, स्टेशन रोड उड्डाणपुल आणि मानकापूर उड्डाणपुलांच्या कामांतील त्रुटींच्या अहवालाबाबत**

**(१२) १४००२ (०७-०४-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील मेहंदीबाग उड्डाणपूल, रामझुला, स्टेशन रोड उड्डाणपुल आणि मानकापूर उड्डाणपुलाचा अभ्यास व्हीएनआयटीने केला असून या चारही उड्डाणपुलाच्या कामांतील त्रुटीचा अहवाल महापालिका व नागपूर सुधार प्रन्यास यांना माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालानुसार शासनाने सदरहू त्रुटींची दखल घेतली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या त्रुटी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव शहराच्या विकासाबाबत पी.पी.पी.पॅटर्न राबविण्याबाबत**

**(१३) १४००४ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहराच्या विकासाबाबत पी.पी.पी.पॅटर्न राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर नागरिकांना सर्व मुलभूत सुविधा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) जळगांव शहराच्या विकासाबाबत पी.पी.पी. पॅटन राबविण्यासंदर्भात कोणताही प्रस्ताव जळगांव महानगरपालिकेच्या विचाराधीन नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव महानगरपालिका कर्मचाऱ्यांना वेतन मिळत नसल्याबाबत**

**(१४) १४००६ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव महानगरपालिका कर्मचाऱ्यांना गेले दोन महिने वेतन मिळत नसल्याने त्यांनी माहे जानेवारी, २०१५ पासून काम बंद आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्मचाऱ्यांना वेतन वेळेवर न मिळण्याची कारणे काय आहे,
(३) असल्यास, वेतन वेळेवर मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) तत्कालीन जळगांव नगरपालिकेने विविध विकास कामांसाठी हुडको व जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड महानगरपालिकेकडून विहित मुदतीत होऊ शकली नाही. परिणामी कर्ज परतफेडीसंदर्भ मा.उच्च न्यायालयाकडील याचिका क्र.१०३६६/२०१४ मध्ये दिलेल्या आदेशानुसार हुडको या वित्तीय संस्थेस दरमहा तीन कोटी व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्याकडील याचिका क्र.१७१७/२००३ मधील आदेशानुसार जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस दरमहा एक कोटी इतकी रक्कम अदा करावी लागत आहे. तसेच विविध कारणामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात देखील घट झाली आहे.

या कारणास्तव महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन व सेवानिवृत्तीवेतन अदा करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे. सद्यस्थितीत माहे फेब्रुवारी, २०१५ चे वेतनाचे प्रदान महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

---

**महाराष्ट्रातील पाण्याची टंचाई दुर करण्यासाठी नारपार नदीतील पाणी अडवून गिरणा नदीत वळवून गिरणा खो-यातील पाण्याच्या प्रश्न मार्गी लावण्याबाबत**

**(१५) १४००८ (०८-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील पाण्याची टंचाई दुर करण्यासाठी नारपार नदीतील पाणी अडवून गिरणा नदीत वळवून गिरणा खो-यातील पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा या मागणीसाठी जळगांव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जळगाव जिल्ह्यातील सर्वपक्षीयांनी माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात उपोषण केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :**(१) होय.

(२) नार, पार, अंबिका, औरंगा नदी खोऱ्यातील सर्वसाधारणपणे २०० मी. उपसा उंचीच्या मर्यादेत उपलब्ध होणारे पाणी गिरणा खोऱ्यात नार-पार-गिरणा नदी जोड योजनेद्वारे वळविण्याचे प्रस्तावित आहे व सदर योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागणाऱ्या खर्चास दिनांक २३.१२.२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव येथील राज्य कामगार कल्याण मंडळाची राखीव असलेली मेहरुण शिवारातील जागा मंडळाला देण्याबाबत**

**(१६) १४०१८ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव येथील राज्य कामगार कल्याण मंडळाची राखीव असलेली मेहरुण शिवारातील जागा मंडळाला मिळण्याबाबतचे निवेदन माहे डिसेंबर, २०१४ मध्ये स्थानिक लोकप्रितनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे कोणती ?

**श्री. प्रकाश मेहता (२०-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव मधील नेरी नाका स्मशानभुमी समोरील घिसाडी समाजातील लोकवस्तीत मुलभुत सोयी सुविधा देण्याबाबत**

**(१७) १४०२४ (०८-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव मधील नेरी नाका स्मशानभुमी समोरील जागेत घिसाडी (पांचाळ) समाज गेली ७०-७५ वर्षापासून राहात असून या लोकवस्तीत नळ, वीज व कच्चे गाळे बांधून मिळण्यासाठी सन १९९६ मध्ये नगरपालिकेने मंजूरी देऊनही काम अपूर्ण असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव नगरपालिकेने या लोकवस्तीत मुलभूत सोयी सुविधा न देण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच या लोकवस्तीत मुलभूत सोयी सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५)** :(१) हे खरे नाही.

अशा प्रकारचे निवेदन महानगरपालिकेस दिनांक २४.१२.२०१४ रोजी प्राप्त झाले असून, निवेदनात नमूद केल्याप्रमाणे तत्कालिन नगरपालिकेने वा सद्याच्या महानगरपालिकेने या लोकवस्तीत नळ, वीज, कच्चे गाळे बांधून देण्याबाबत कोणत्याही प्रकारची मंजूरी दिलेली नाही.

(२), (३) व (४) सदरची जागा शासकीय असून, झोपडपट्टी ही अनधिकृत व अतिक्रमित असल्याने, महानगरपालिकेमार्फत सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत.

---

**आंबोडा ग्रुप ग्रामपंचायत (ता.सुरगाणा, जि.नाशिक) च्या कार्यक्षेत्रातील नळपाणी पुरवठा योजना नियमित सुरु करण्याबाबत**

**(१८) १४०२७ (०६-०४-२०१५). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबोडा ग्रुप ग्रामपंचायत (ता.सुरगाणा, जि.नाशिक) च्या कार्यक्षेत्रातील आंबोडा, केळावण, आंबेपाडा, अबुपाडा, कोळीपाडा, खिराटमाळ व सरमाळा या गावासाठी नळपाणी पुरवठा योजना सन २००६-०७ ते २०१२-१३ या कालावधीत मंजूर करून सदर योजनांचे काम पूर्ण करण्यात आले असून त्यांचे पैसे पूर्णपणे खर्ची टाकले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना सुरु करुन ग्रामपंचायती कडे हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत काय,

(३) असल्यास, सदर नळपाणी पुरवठा योजना नियमित सुरु आहेत काय व त्या योजनांच्या पाण्याचा लाभ गावक-यांना मिळत आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१५-०६-२०१५)** :(१) व (२) आंबोडा ग्रुप ग्रामपंचायत (ता.सुरगाणा जि.नाशिक) च्या कार्यक्षेत्रातील अंबोडा, केळावण, अंबेपाडा, अबुपाडा व कोळीपाडा या पाच पाणी पुरवठा योजनांची कामे पुर्ण झालेली असुन योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे व या पाच पाणी पुरवठा योजना ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच खिराटमाळ व सरमाळ या दोन योजनांचे काम प्रगतीत आहे. सदर ७ पाणी पुरवठा योजनांची अंदाजपत्रकीय किंमत रु.८१,८७,८४५/- लक्ष इतकी असून वितरीत केलेला निधी रु.५३,९२,६२६/- लक्ष आहे व योजनांवर रु.५१,७९,६३३/- इतका खर्च झालेला आहे.

(३) आंबोडा ग्रुप ग्रामपंचायत (ता.सुरगाणा जि.नाशिक) च्या कार्यक्षेत्रातील अंबोडा, केळावण, अंबेपाडा, अबुपाडा व कोळीपाडा या पाच पाणी पुरवठा योजना नियमित सुरु असुन योजनेद्वारे गावास पाणी पुरवठा सुरु आहे.

खिराटमाळ व सरमाळ या दोन योजनांच्या उद्भव विहीरीचे काम पूर्ण झाल्याने व विहिर गावाजवळ असल्याने गावकरी पिण्याच्या पाण्यासाठी वापर करीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबोडा (ता.सुरगाणा, जि.नाशिक) येथील ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत बांधण्यात आलेले मंगल कार्यालय आदिवासी विकास महामंडळास भाड्याने दिल्याबाबत**

**(१९) १४०३२ (१०-०४-२०१५). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रुप ग्रामपंचायत आंबोडा (ता.सुरगाणा, जि.नाशिक) या ग्रामपंचायतीचे ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत सन २००७-०८ मध्ये रु. १० लक्ष किंमतीचे मंगल कार्यालय, आंबोडा या गावी बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंगल कार्यालय हे दिनांक १ जून, २०१० रोजी सरपंच ग्रामपंचायत आंबोडा यांनी महाराष्ट्र राज्य सह. आदिवासी विकास महामंडळ मर्या. उप प्रादेशिक कार्यालय सुरगाणा यांना प्रतिमहा रु. १६००/- ला दिल्याची तक्रार दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजी मे.आदिवासी आयुक्त नाशिक यांच्याकडे केली होती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीत दोषी आढळून आलेल्या दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय. खावटी कर्ज योजनेअंतर्गत सभासदांना खावटी वाटपाचे धान्य व साहित्य ठेवण्यासाठी बाऱ्हे विभागात आदिवासी विकास महामंडळाकडे गोदाम उपलब्ध नसल्यामुळे व सभासदांना धान्य घेणेसाठी गोदाम जवळ असावे ह्या उद्देशाने आदिवासी विकास महामंडळाने ग्राम पंचायत आंबोडे यांना विनंती केली होती. त्यानुसार आदिवासी विकास महामंडळाकडे त्यांनी ग्राम पंचायत सोबत करारनामा करुन सदर मंगल कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात भाड्याने दिले होते.

(४) गट विकास अधिकारी यांना ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेले मंगल कार्यालय/सभागृह भाड्याने देण्यात येवू नये व त्याचा वापर स्थानिक जनतेसाठी करण्यात यावा, अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. मात्र, सदर मंगल कार्यालय शासकीय कामासाठी तात्पुरत्या स्वरुपात भाड्याने घेतले असल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रुप ग्रामपंचायत आंबोडा ( ता.सुरगाणा, जि.नाशिक) येथे इंदिरा आवास योजनेअंतर्गत अपात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा हप्ता दिल्याबाबत**

**(२०) १४०३३ (०८-०४-२०१५). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रुप ग्रामपंचायत आंबोडा ता.सुरगाणा, जि.नाशिक या ग्रामपंचायत मध्ये सन २०१३-१४ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत २८३ गरीब आदिवासींना घरकुले मंजूर झाली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील २८३ घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांची चौकशी करुन योजनेस पात्र असतील त्यांना लाभ द्यावा व अपात्र असतील त्यांना वगळावे असा तक्रार अर्ज मा.सभापती पंचायत समिती सुरगाणा यांनी दिनांक १२ नोव्हेंबर, २०१२ रोजी वा त्या सुमारास मे.विभागीय आयुक्त नाशिक यांच्याकडे दिला होता हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, वरील लाभांर्थ्यांपैकी किती लाभार्थी अपात्र आढळून आले आहेत,
(५) अपात्र लाभार्थी आढळून आल्यानंतरही त्या अपात्र लाभार्थ्याला घरकुलाचा पहिला हप्ता रु. ३५००० चा दिला आहे हे खरे आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पेठ यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(४) चौकशीमध्ये २८३ लाभार्थ्यांपैकी ३२ लाभार्थी अपात्र आढळून आले आहेत.
(५) होय.
३२ अपात्र लाभार्थ्यांपैकी २२ लाभार्थ्यांना अनुदान देण्यात आले आहे. अनुदान वसूलीची कार्यवाही गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सुरगाणा यांचेमार्फत करण्यात येत आहे.

---

### आंबोडा (जि.नाशिक) ग्रुपग्रामपंचायती मधील इंदिरा आवास घरकुल योजनेतील लाभार्थाने केलेल्या उपोषणाबाबत

**(२१) १४०३४ (०८-०४-२०१५). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबोडा (जि.नाशिक) ग्रुप ग्रामपंचायती मधील इंदिरा आवास घरकुल योजनेचे लाभार्थी श्री.योगीराज चिंतामण पवार सरपंच ग्रामपंचायत आंबोडा, याच्या नेतृत्वाखाली दिनांक ७ एप्रिल, २०१४ रोजी वा त्या सुमारास सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत सुरगाणा पंचायत समिती (जि.नाशिक) कार्यालयासमोर बैठे उपोषण केले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपोषण कर्त्यांनी इंदिरा आवास घरकुल लाभार्थ्यांना अग्रीम रु. ३५००० च्या चेकची मागणी केली होती हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अग्रीम रक्कमेचे चेक गट विकास अधिकारी पं.स. सुरगाणा याच्याकडून देण्यास भाग पाडले हे खरे आहे काय,
(४) असल्यास, चेक दिलेले सर्व लाभार्थी पात्र होते काय,
(५) नसल्यास, सदर लाभार्थ्यांवर कोणती कारवाई केली गेली अथवा करणार आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) धनादेशाचे वाटप केलेल्या ८१ लाभार्थ्यांपैकी २२ लाभार्थी अपात्र आढळून आले आहेत.
(५) धनादेशाचे वाटप केलेल्या २२ अपात्र लाभार्थ्यांकडून अनुदान वसुलीबाबत नोटीस दिलेली असून, गट विकास अधिकारी यांचेमार्फत वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

---

**अमरावती येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणेबाबत**

**(२२) १४०४७ (०९-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती हे विभागीय मुख्यालय असून आरोग्याच्या बाबतीत अतिसंवेदनशिल असलेल्या मेळघाट सारख्या परिसराचा समावेश या जिल्ह्यात होत असल्याने येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, केंव्हापर्यंत उक्त ठिकाणी रुग्णालय स्थापन होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर्णी (जि.यवतमाळ) शहरातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटविण्याबाबत**

**(२३) १४०५४ (०७-०४-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी (जि.यवतमाळ) शहरातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटविण्यासाठीचे रूपये ४२ कोटी नगरपलिककेकडे दोन वर्षापासून पडून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामांच्या निविदा काढण्याबाबत संबंधित अधिकारी टाळाटाळ करित असल्यामुळे सदर काम रेंगाळत पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०६-२०१५) :**(१) व (२) आर्णी शहराकरीता अरुणावती धरणावरुन सुजल व निर्मल अभियानांतर्गत पाणी पुरवठा योजनेस शासन निर्णय दिनांक १२.१२.२०१३ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. सदर योजनेच्या पहिल्या टप्प्याची व कंत्राटदाराच्या पूर्वअर्हतेची ई-निविदा दिनांक १.०८.२०१४ ला प्रकाशित केली होती. तथापि, सदर कार्यवाहीस जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिनांक २६.०८.२०१४ रोजी स्थगिती दिली होती. सदर स्थगिती

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर पालिका प्रशासन अमरावती यांनी दिनांक २३.०३.२०१५ ला उठविली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या होण्याच्या दृष्टीने योजनेची निविदा प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने करण्याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर योजना राबविण्यासाठी दिनांक २२.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये नगरपरीषद, आर्णी यांना रुपये ९००.०० लक्ष इतके अनुदान वितरीत केले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एरंडोल-पारोळा(जि. जळगांव) विधानसभा मतदार संघात अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(२४) १४०६२ (०७-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एरंडोल-पारोळा (जि.जळगांव) विधानसभा क्षेत्रात सट्टा, जुगार, पत्त्यांचे क्लब, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादी धंदे बेकायदेशीररीत्या सर्रासपणे सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक आमदार तसेच नागरिकांनी गेल्या काही महिन्यापासून पोलिसांत तक्रारी करुनही कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अवैधधंदे बंद करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) अवैध धंदे सुरु राहणार नाहीत याची दक्षता घेणेबाबत मा.आमदार महोदयांनी सूचना केली असल्याचे खरे आहे.

या क्षेत्रात अवैध धंदे सुरु नाहीत तथापि पोलीसांची नजर चुकवून चोरुन लपून सट्टा/पत्ता जुगार संबंधित माहिती काढून त्याविरुध्द ठोस कारवाई करण्यात आली आहे.
(३) सन २०१५ मध्ये एरंडोल व पारोळा पोलीस स्टेशनमध्ये चोरुन लपून चालणा-या अवैध धंद्याची माहिती काढून १२ गुन्ह्यात १२ आरोपींना अटक करुन रु.७४२०/- किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच अवैध प्रवाशी वाहतुकीबाबत २९ प्रकरणात एकूण रु.२४५००/- दंड वसूल करण्यात आला आहे.

अवैध सट्टा/पत्ता जुगार धंदे व अवैध प्रवाशी वाहतुकीस सक्रिय राहणा-या गुन्हेगारांविरुध्द आवश्यकतेनुसार प्रतिबंधक उपाययोजना वेळोवेळी करण्यात आली असून अवैध धंदे नेस्तनाबूत करणेसाठी विशेष मोहिम राबविण्यात आलेली आहे. यापुढेही देखरेख ठेवून अवैध धंद्यांना चालना मिळणार नाही यासाठी पाठपुरावा करुन ठोस कारवाई करण्यात येत आहे. पारोळा व एरंडोल गांव/परिसरात अवैध सट्टा/जुगार, पत्ता जुगार क्लब बंद आहे. तसेच अवैध प्रवाशी वाहतूक देखील बंद करण्यात आली आहे. कुठलेही अवैध धंदे सुरु होणार नाहीत या बाबत संपूर्ण दक्षता घेतली जात आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**त्र्यंबकेश्वर, (जि.नाशिक) व पेठ दिंडोरी पातळेश्वर मंदिर परिसरातील विकास कामे अतिशय निष्कृष्ट दर्जाची करण्यात आल्याबाबत.**

**(२५) १४०७३ (०८-०५-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वऱ (जि.नाशिक) व पेठ दिंडोरी मालेगावकरांचे श्रध्दास्थान असलेले पातळेश्वर मंदिर परिसरातील सुमारे रुपये ५० लाख खर्च करुन पर्यटन विकास महामंडळाने सुरु केलेली विकास कामे अतिशय निष्कृष्ट दर्जाची करण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास आढळून आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू निष्कृष्ट दर्जाचे काम करणा-या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

सदरचे काम दि. ३०/१/२०१४ पर्यंत पूर्ण करण्यात आले आहे व आजमितीस हे काम सुस्थितीत असल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी वाहन वापर कर्त्यांकडून ग्रीन टॅक्स भरला जात नसल्याबाबत**

**(२६) १४०७९ (०८-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १.६२ लाख खाजगी वाहन वापर कर्त्यांकडून ग्रीन टॅक्स भरला नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदेर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा, कोल्हापुर, यवतमाळ, बारामती इ. परिवहन विभागामध्ये ह्याचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले, हे हीखरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी व व्यवसायिक वाहन किती वर्षे वापरावीत याबाबत शासनाचे काय नियम आहेत,

(४) असल्यास, त्याबाबत शासनाने काय कारवाई केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१५) :**(१) व (२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, कोल्हापूर वगळता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बारामती, यवतमाळ, सातारा या कार्यालयांतर्गत पर्यावरण कर वसुलीची कोणतीही थकबाकी नाही.

(३) खाजगी व व्यावसायिक वाहनांचे आयुष्यमान निश्चित करण्याचा अधिकार मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ५९ अन्वये केंद्र शासनास असून त्याप्रमाणे अद्यापी आयुष्यमान निश्चित केलेले नाही.
(४) वाहनांचे आयुष्यमान निश्चित करण्याचा अधिकार केंद्र शासनास असल्यामुळे राज्य शासनास हे अधिकार वापरता येत नाहीत. तथापि, जुनी वाहने अधिक प्रदुषणकारी असल्याने त्यांचेवर ठराविक वर्षांनंतर पर्यावरण कर लागू करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चाबुकस्वारवाडी (ता.मिरज, जि.सांगली) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुरीबाबत**

**(२७) १४१०३ (०८-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चाबुकस्वारवाडी (ता.मिरज, जि.सांगली) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.आरोग्य मंत्री यांना दिनांक ७ जून, २०१३ रोजी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे चाबुकस्वारवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सलगरे येथे स्थलांतरीत केल्यास बेळंकी, जानराववाडी, कदमवाडी, डोंगरवाडी, संतोषवाडी, शिपुर, लिंगनुर, खटाव येथील सर्व ग्रामस्थांना आरोग्याच्या दृष्टीने सोयीचे होणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०७-२०१५) :**(१) शासन निर्णय दि.१७.०१.२०१३ अन्वये चाबुकस्वारवाडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर करण्यात आले आहे.
(२) अंशत: खरे आहे. तत्कालीन कोयला, राज्यमंत्री, भारत सरकार यांनी दि.१.०३.२०१३ च्या पत्रान्वये चाबुकस्वारवाडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता जागा उपलब्ध होत नसल्याने ते सलगरे ता.मिरज येथे स्थलांतरीत करण्याबाबत विनंती केली आहे.
(३) व (४) हे खरे आहे.

चाबुकस्वारवाडी येथील मंजुर प्राथमिक आरोग्य केंद्र सलगरे, ता.मिरज, जि.सांगली येथे स्थलांतरीत करण्याबाबत जिल्हा नियोजन समिती, सांगलीने दिनांक २२.०१.२०१५ रोजी शिफारस केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आदित्य हॉस्पिटल (ता.मिरज, जि.सांगली), विश्रामबाग येथील हॉस्पिटलचा राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत समावेश करण्याबाबत

**(२८) १४१२१ (०८-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील आदित्य हॉस्पिटल विश्रामबाग हे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल असून या हॉस्पिटलचा राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. लोकप्रतिनिधी मिरज यांनी या हॉस्पिटलमध्ये Cleft Lip व Cleft Palate Related Plastic Surgery करणेसाठी दिनांक १४ जानेवारी, २०१४ रोजी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. पद्मभुषण वसंतदादा पाटील सिव्हिल सर्जन शासकिय रुग्णालय, सांगली यांनी या शस्त्रक्रिया सांगली, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्ह्यामध्ये कोणत्याही शासकिय रुग्णालयामध्ये वा वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्लॉस्टिक सर्जरी हा विभाग अस्तित्वात नसल्याने आदित्य हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करणेसाठी शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य सोसायटी व नॅशनल इन्शुरन्स कंपनी यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार Cleft Lip व Cleft Palate Ralated Plastic Surgery यावरील उपचार / शस्त्रक्रिया शासकीय रुग्णालयांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदर आजारावरील उपचार करण्यासाठी अन्य खाजगी रुग्णालयास मान्यता देता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई-गोवा महामार्गावर वडखळ नाक्यावर ट्रामा सेंटर उभारण्याबाबत

**(२९) १४१३१ (०८-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावर अपघात झाल्यास तातडीने उपचार मिळावेत म्हणून वडखळ नाक्यावर ट्रामा सेंटर उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०६-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.
(२) होय.
(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १७ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्यात आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा मंजुर केलेला आहे. त्यामध्ये वडखळ नाका येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व २० खाटांचे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर युनिटच्या बांधकामासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करणेबाबतची कार्यवाही चालु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्य शासनाने महसूल वाढविण्यासाठी वेगवेगळ्या विभागांमार्फत आकारल्या जाणा-या दंडाच्या रक्कमेत वाढ करण्याच्या निर्णयबाबत**

**(३०) १४१३४ (०८-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने महसूल वाढविण्यासाठी वेगवेगळ्या विभागांमार्फत आकारल्या जाणा-या दंडाच्या रक्कमेत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दंडामुळे राज्य शासनाला किती महसूल मिळणार आहे,
(३) असल्यास, दंड घेण्याबाबत शासनाने काही नियम केले आहेत काय,
(४) असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०४-२१०५) :**(१), (२), (३) व (४) विविध अधिनियम व नियमांतर्गत आकारला जाणारा दंड हा राज्याच्या महसुलाचा मुख्य स्त्रोत नसून दंडाचा मुख्य उद्देश हा त्या अधिनियम/नियमांतर्गत अनुसरल्या जाणा-या अनियमिततेस पायबंद घालणे हा आहे. त्यामुळे महसूल वाढविण्यासाठी वेगवेगळ्या विभागामार्फत विविध अधिनियम व नियमासाठी आकारला जाणा-या दंडामध्ये सरसकट वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही. तथापि, महसूल व वन विभागाने महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम व महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम अंतर्गत दंडाच्या रकमेत तसेच मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने तडजोड शुल्कामध्ये वाढ करणे प्रस्तावित आहे.

---

**राज्यातील जुन्या २२ प्रकल्पांना जलसंपदा विभागाकडून**
**सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(३१) १४१५१ (०८-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जुन्या २२ प्रकल्पांना जलसंपदा विभागाने सुधारित प्रशासकीय मान्यता माहे जानेवारी, २०१५ मध्ये देण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे प्रकल्प कोणकोणत्या वर्षातले आहेत,

(३) असल्यास, या सुधारित प्रकल्पांच्या किंमतीत २२५ कोटीची वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

फेब्रुवारी २०१५ मध्ये २२ प्रकल्पांना सुधारीत प्रशासीय मान्यता प्राप्त करण्यात आली.

(२) सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता १९८५ ते २००९ दरम्यान देण्यात आली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पाच्या सुधारीत किंमतीत रु.२७७ कोटींची वाढ झाली आहे.

---

**तोराडी गाव म्हसळा (जि.रायगड) पोलीस स्टेशनला जोडणेबाबत**

**(३२) १४१५८ (०७-०४-२०१५). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तोराडी (ता.म्हसळा, जि.रायगड) हे गाव सुमारे ४० ते ५० कि.मी. दूर असलेल्या गोरेगाव पोलीस स्टेशनला जोडण्यात आले आहे त्यामुळे नागरिकांना जाण्या- येण्यासाठी खूप गैरसायीचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाव म्हसळा जि.रायगड या पोलीस स्टेशनला जोडण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे तोराडी बौध्दजन संघ (मुंबई) यांनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार तोराडी गाव म्हसळे (जि.रायगड) पोलीस स्टेशनला जोडणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) व (२) होय हे खरे आहे.

(३) सदरचे गाव हे म्हसळा (जि.रायगड) पोलीस स्टेशनला जोडणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत योग्य तीकार्यवाही पोलीस अधिक्षक रायगड करीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुष्ठरोग पिडितांच्या समस्यांबाबत करावयाच्या उपाययोजना

**(३३) १४१६४ (०८-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुष्ठरोग पिडीत रुग्णांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी राज्य शासनातर्फे दर महिन्याला ६०० रुपये अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कुष्ठरोग निर्मूलनासाठी शासनातर्फे दरवर्षी कुष्ठरोग निवारण मोहिम राबविली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची भुमिका काय आहे, कुष्ठरोग्यांचा स्वतंत्र उपचार करणेसाठी शासनाचे कोठेच स्वतंत्र रुग्णालय नाही असलेले लेप्रेसी रुग्णालय बंद पडले असून वसाहतीतील कुष्ठरोग पिडीतांना वेळेवर औषधोपचार मिळत नाहीत शासनाने त्यांचेवर केवळ उपचार न करता त्यांचे पुनर्वसन करावे अशी मागणी असून शासनाच्या ६०० रुपयावर महिना कसा काढावा म्हणून ते अनेकवेळा भिक मागताना दिसतात हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुष्ठरोग पिडीतांच्या उपरोक्त समस्यांबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे अथवा करण्यात येणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५)** :(१) हे खरे आहे.

कुष्ठरोग पिडीत रुग्णांना संजय गांधी निराधार अनुदान याजनेअंतर्गत प्रतिलाभार्थी प्रतिमाह रु.६००/- अनुदान दिले जाते.

(२) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दरवर्षी जानेवारी-फेब्रुवारी या कालावधीत कुष्ठरोग निवारण मोहीम राबविण्यात येते.

(३) हे अंशत: खरे आहे.

डॉ.बंदोरवाला लेप्रसी रुग्णालय, पुणे व शेंडापार्क कुष्ठधाम, कोल्हापूर या दोन कुष्ठरुग्णालयात उपचारांकरिता येणाऱ्या सर्व कुष्ठरुग्णांवर उपचार करण्यात येतो. मात्र सर दि.मा.पेटीट रुग्णालय रत्नागिरी व कुष्ठधाम वसाहत रुग्णालय, उस्मानाबाद या रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या प्रमाणात घट झाल्याने ही कुष्ठरुग्णालये बंद आहेत.

कुष्ठवसाहतीतील कुष्ठरुग्णांना वैद्यकीय सेवा देण्यानुषंगाने वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत नियमित भेटी देऊन मोफत औषधोपचार तसेय गुंतागुत असलेल्या कुष्ठरुग्णांना शासकीय व निमशासकीय दवाखान्यांमध्ये आरोग्य सुविधा देण्यात येतात. त्याचप्रमाणे, सर्व रुग्णालयात कुष्ठरुग्णांबाबत कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता इतर आजाराप्रमाणे योग्य औषधोपचार दिला जावा आणि कुष्ठरुग्णांना व त्यांच्या कुटूंबियांना योग्य असे वातावरण व सुविधा असाव्यात परंतु स्वतंत्र अशी वसाहत असू नये अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) शासनाने कुष्ठपिडीतांसाठी विविध उपाययोजना केल्या असून त्या पुढीलप्रमाणे आहेत:-

अ) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२१.०३.२०१२ च्या शासन निर्णयानुसार १३ रुग्णालयीन व १६ पुनर्वसन तत्वावर कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुक्रमे रु.२२००/- व रु.२०००/- प्रति रुग्ण प्रतिमाह देण्यात येतात.

ब) विकृती असलेल्या कुष्ठरुग्णांस पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेसाठी रु.८०००/- अनुदान देण्यात येते.
क) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१७.११.२०१४ च्या शासन निर्णयानुसार कुष्ठवसाहतीत राहणाऱ्या व जखमा असणाऱ्या रुग्णांच्या जखमांवर ड्रेसिंग करण्यासाठी ड्रेसरला रुग्णसंख्येनुसार रु.२०००/-, रु.४०००/-, व रु.५०००/- प्रतिमाह मानधन देण्यात येते.
ड) गरजू कुष्ठरुग्णांस एम.सी.आर. चप्पल, गॉगल्स, स्प्लिट्स, सेल्फ केअर किट मोफत पुरविले जाते.

---

**बुलढाणा शहर (ता.जि.बुलढाणा) येथील रस्त्यावर दिशादर्शक फलक लावणेबाबत**

**(३४) १४२०४ (१०-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहर (ता.जि.बुलढाणा) हे जिल्ह्याचे ठिकाण असल्यामुळे शहराचा मोठ्या झपाट्याने विस्तार होत असून, वाहनांची वर्दळ वाढली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्यावर दिशादर्शक फलक नसल्याने शहरातील विविध शासकीय कार्यालय, सामान्य रुग्णालय, बँका, विश्रामगृहे व इतर ठिकाणी जाण्यास व नविन येणाऱ्या तसेच रात्री-अपरात्री प्रवाश्यांना मार्गक्रमण करण्यास अडचणी येत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवाश्यांना होणारा त्रास टाळण्यासाठी रस्त्यावर दिशादर्शक फलक लावण्याची मागणी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा यांचेकडे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१५) :**(१) होय.
(२) नाही.

बुलढाणा शहरातून जाणा-या मलकापूर-बुलढाणा-चिखली प्र.रा.मा.-१३ या रस्त्यावर आवश्यक त्या ठिकाणी महत्वाच्या संगम स्थानावर पोर्टल फ्रेमवर दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत.
(३) लेखी निवेदन आढळून येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चौंढे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना अद्यापी महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्यात आले नसल्याबाबत.**

**(३५) १४२३५ (०४-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील चौंढे येथील घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पातील १२ प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीकडून बीटीआरआय सेंटर एकलहरे नाशिक येथे कंपनीच्या खर्चाने ३ वर्षाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ वर्षाचे प्रशिक्षण संपल्यानंतरही या प्रकल्पग्रस्तांना अद्यापी महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास या प्रकल्पग्रस्तांना सेवेत समावून घेणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०७-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

सदर प्रकल्पाग्रस्तांची जमिन ही महानिर्मिती कंपनीच्या विद्युत केंद्राकरीता संपादित करण्यात आलेली नसून सदरचे प्रकल्पग्रस्त हे धरणाच्या बुडीत क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त असल्याने त्यांना नोकरीत सामावून घेण्याची जबाबदारी महानिर्मिती कंपनीची नाही.

(३) तसेच मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या पूर्णपीठाने दि.०९.०८.२००९ रोजी प्रकल्पग्रस्तांची भरती जाहिरात देऊन उमेदवाराची पात्रता तपासून स्पर्धा परिक्षेद्वारे गुणवत्तेच्या आधारे करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ दि.२७.१०.२००९ अन्वये सरळसेवा भरती करताना सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.

(४) महाराष्ट्र शासन निर्णयक क्र.एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१.०१.१९८० अन्वये महानिर्मिती कंपनीतर्फे गट-क व गट-ड या संवर्गातील पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरताना एकूण रिक्त जागेच्या ५% जागा प्रकल्पग्रस्त उमेदवारांकरीता राखीव ठेवण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पुरातन आजोबा पर्वत देवस्थानाच्या दुरावस्थाबाबत**

**(३६) १४२३८ (०८-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात सुमारे ७ हजार वर्षापूर्वीच्या रामायणकालीन पुरातन वारसा असणाऱ्या आजोबा पर्वत देवस्थानाची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या देवस्थानाला विविध प्रांतातून मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देत असतात परंतु देवस्थानात जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही तसेच त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची व इतर सोयी सुविधा नसल्यामुळे पर्यटकांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या देवस्थानांकडे जाणाऱ्या रस्त्यासह इतर सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) मौजे डेहणे या गावापासून देवस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याची एकूण लांबी ४५०० मीटर आहे. यापैकी १४०० मीटर लांबीचा रस्ता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शहापूर यांचेमार्फत बांधण्यात आला आहे. उर्वरित रस्त्याची लांबी वन विभागाच्या कार्यकक्षेत येत असल्याने, सदर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत वनसंरक्षक, वन विभाग, शहापूर यांना विनंती करण्यात आली आहे. सदर जागा उपलब्ध झाल्यावर रस्त्याचे बांधकाम हाती घेण्यात येईल. तसेच देवस्थानाची जमीन वन विभागाच्या मालकीची असल्याने सदर जागेवर इतर सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी वन विभागाची परवानगी आवश्यक आहे. प्रथम टप्प्यात रस्त्याच्या कामाबाबत वन विभागाकडे पाठपुरावा सुरु असून, तद्नंतर इतर सोयी-सुविधा पुरविणेसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत वन विभागास विनंती करण्यात येईल. सद्य:स्थितीत सण व उत्सवाच्या कालावधीत गावातील ग्रामस्थांमार्फत भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

---

**शासकीय सेवेत थेट नियुक्ती मिळालेल्या राज्यसेवा गट (अ) व (ब) पदी असणा-या खेळाडूंची परिक्षा रद्द करण्याबाबत**

**(३७) १४२५२ (०९-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सेवेत थेट नियुक्ती मिळालेल्या राज्यसेवा गट (अ) व (ब) पदी असणा-या खेळाडूंची परिक्षा रद्द करण्याकरीता दिनांक ९ जुलै, २०१३ रोजी तत्कालीन विधान परिषद विरोधी पक्ष नेत्यांनी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच उक्त पदी असणा-या खेळाडूंना शासनाने कोणकोणत्या सवलती उपलब्ध करुन दिल्या आहेत वा देणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०७-२०१५)** :(१) व (२) शासन सेवेत थेट नियुक्ती दिलेल्या खेळाडू कर्मचाऱ्यांपैकी जे खेळाडू स्पर्धेत भाग घेत आहेत अशा खेळाडुंना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी एक जादा संधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा तसेच वयाची ४५ वर्षे पुर्ण केलेल्या खेळाडूंना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे.

(३) थेट नियुक्ती दिलेल्या खेळाडूंना त्याच्या मागणीनुसार आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्पर्धा, स्पर्धापुर्व प्रशिक्षण शिबीरे इ. मध्ये सहभागी होण्यासाठी सवलत देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रत्येक जिल्हयात घरकुलाकरीता प्रतिक्षा यादी तयार करुन कमी लाभार्थी असलेल्या गावांना प्रथम लाभ देण्याबाबत**

**(३८) १४२७१ (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रत्येक जिल्हयात घरकुल करीता प्रतिक्षा यादी तयार करुन कमी लाभार्थी असलेल्या गावांना प्रथम लाभ देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जास्त लाभार्थी असलेल्या गावातील बेघर व अत्यंत गरजू लोकांना घरकूल योजनेचा लाभ देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बेघर व अत्यंत गरजू असूनही गावात जास्त लाभार्थी संख्या असल्यामुळे बेघर व अत्यंत गरजू लोकांना घरकुलाचा लाभ मिळत नसल्यामुळे त्यांचेवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(४) यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५)** :(१) होय.

(२) कमी लाभार्थी शिल्लक असलेल्या गावांना प्रथम प्राधान्याने लाभ देण्यात येत असून चढत्या क्रमाने उद्दिष्ट उपलब्धतेनुसार जास्त लाभार्थी शिल्लक असलेल्या गावांना लाभ दिला जातो.

(३) जिल्हयांना देण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या तुलनेत प्रत्येक ग्रामपंचायतीला देण्यात येणाऱ्या घरकुलांची संख्या फारच कमी असते. त्यामुळे योजनेचा दृश्यस्वरुपात परिणाम दिसण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उपराजधानी नागपूर येथे भुमी अभिलेख प्रबोधिनी स्थापन करण्याबाबत**

**(३९) १४२७३ (०४-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपराजधानी नागपूर येथे भुमी अभिलेख प्रबोधिनी स्थापन करण्याचा शासनाचा हेतू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास भुमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी अभावी नागपूर व अमरावती विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी औरंगाबाद येथे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास दि.१०/४/२०१३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री तसेच तत्कालीन महसुल मंत्री महोदयांनी संघटनेच्या शिष्टमंडळाला आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :**(१), (२) व (३) होय.

(४) व (५) उपराजधानी नागपूर येथे भूमि अभिलेख प्रबोधिनी स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख पुणे यांच्याकडून प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर उचित निर्णय घेण्याच्या दृष्टीने छाननी सुरु आहे.

---

**मे.युनीव्हर्सल फेरो अँड अलाईज के.लि.मानेक नगर (तुमसर, जि.भंडारा)**
**हा कारखाना सुरु करण्याबाबत**

**(४०) १४२८५ (१०-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.युनीव्हर्सल फेरो अँड अलाईज के.लि.मानेक नगर (तुमसर, जि.भंडारा) हा कारखाना सुरु करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (तुमसर) यांनी मा.उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांना दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानूसार शासन काय कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१३-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मे. युनीव्हर्सल फेरो ॲन्ड अलाईज के.लि. या उद्योग घटकाचे रु.१७५ कोटीचे वीज देयक थकित असल्याने महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीने दि. २५.५.२००४ रोजी वीज पुरवठा खंडीत करुन वीज देयकाच्या वसूलीसाठी भंडारा येथील न्यायालयात ७३/२००४ चा दिवाणी दावा सादर केला आहे.

या कंपनीच्या व्यवस्थापनाने दि.२१.६.२००६ रोजी औघोगिक विवाद अधिनियम १९४७ चे कलम २५ (ओ) अंतर्गत कारखाना बंद करण्याकरिता कामगार आयुक्त, मुंबई यांना अर्ज केला होता. त्यावर सुनावणी होऊन दि.१८.८.२००६ रोजीच्या आदेशान्वये कारखाना बंद करण्यास मंजुरी दिली होती.

परंतु सदर आदेश रद्द करण्याची मागणी कामगार संघटनेने कामगार आयुक्त, मुंबई यांना केल्यामुळे हे प्रकरण दि. १५.९.२००६ रोजी औद्योगिक न्यायालय भंडारा येथे अभिनिर्णयार्थ संदर्भ केले होते, तथापि दि.१४.९.२००९ रोजी कारखान्याला बंद परवानगी देण्याबाबतचा अर्ज या न्यायालयाने फेटाळला आहे.

सदर प्रकरणाच्या निवाडयासंदर्भात कंपनीने मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

**भंडारा जिल्हयात ग्रामपंचायतीची साहित्य खरेदीच्या ई-निविदामध्ये अस्तित्वात नसलेल्या ट्रेडिंग फर्म कंपनीचे नाव नोंदविण्यात आले असल्याबाबत**

**(४१) १४२८७ (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात ग्रामपंचायतीची साहित्य खरेदीच्या ई- निविदामध्ये अस्तित्वात नसलेल्या ट्रेडिंग फर्म कंपनीचे नाव नोंदविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीची संपूर्ण सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, त्यानुसार शासन काय कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहाडी तालुक्यातील (जि.भंडारा) रस्त्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळाल्याबाबत**

**(४२) १४२८९ (१०-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी तालुक्यातील (जि.भंडारा) घोरपड, धुसाळा ला सन २००१ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याचे बांधकाम पूर्ण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या त्यांना अद्यापपर्यंत मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार ज्यांच्या जमिनी संपादित केलेल्या अशा शेतक-यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) दिनांक ०६.०१.२०१५ च्या पत्रान्वये सदर भूसंपादन प्रस्ताव तयार करुन जिल्हाधिकारी (भूसंपादन) भंडारा यांना सादर करण्यात आलेला होता. परंतू, त्या प्रस्तावात काही त्रुटींची पुर्तता करण्यासंदर्भात, जिल्हाधिकारी (भूसंपादन) भंडारा यांनी दिनाक १६.०३.२०१५ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार त्रुटीची पुर्तता करुन प्रस्ताव फेरसादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शुल्कवसुली केल्याबाबत

**(४३) १४३०४ (१०-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन आदेशाचे उल्लंघन करुन अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शुल्कवसुली केल्याप्रकरणी आणि समाजकल्याण विभागाकडून विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या शिष्यवृत्ती अपहार केल्याच्या आरोपावरुन शिक्षण प्रसारक मंडळी संस्थेच्या स.प.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप शेठ यांच्यासह, शिक्षक आणि लिपिकांना अटक करण्यात आल्याची घटना दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त बाबतीत सखोल चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अटक करण्यात आलेल्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०७-२०१५) :**(१) होय.
(२) सर परशुराम महाविद्यालय, पुणे यांचे विरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे कार्यालयामार्फत सदर महाविद्यालयाची दप्तर तपासणी करण्यात आली आहे.

(३) सदर महाविद्यालयाने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेश देतेवेळी शुल्क वसुल केल्याचे निदर्शनास आले व त्यानुषंगाने महाविद्यालयाच्या प्राचार्य व संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द विश्रामबाग वाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी निधीचा केलेला गैरव्यवहार**

**(४४) १४३०७ (०८-०४-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात स्थानिक आमदारांना विश्वासात न घेता जिल्हा परिषदेचे पदाधिकारीच आपल्या सोईने मर्जीतील कंत्राटदारांना निधीचे वाटप करीत असल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निधीवाटपात होत असलेला गैरव्यवहार रोखण्यासाठी शासनाने कोणती ठोस कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सर जमशेटजी जीजीभॉय ग्रुप ऑफ हॉस्पीटल या शासनाच्या मध्यवर्ती रुग्णालयात रुग्णांना वैद्यकीय सुविधा मिळत नसल्याबाबत**

**(४५) १४३१९ (०८-०४-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई महानगरातील सर जमशेटजी जीजीभॉय ग्रुप ऑफ हॉस्पीटल या शासनाच्या मध्यवर्ती रुग्णालयास महाराष्ट्र शासन, भारत सरकार तसेच विविध दानशुर व्यक्ती व देशी/विदेशी/धर्मादाय संस्थांच्या माध्यमातून करोडो रुपयांचा निधी आरोग्य सोयी-सुविधांसाठी सातत्याने मिळत असतानाही या रुग्णालयात रुग्णांना उपचारा दरम्यान बसत असलेला अपूरी वैद्यकीय मदत/असुविधेचा फटका तसेच विविध चाचण्यांकरिता खाजगी दवाखाने, रुग्णालयाकडे, पॅथालॉजी सेंटरना भेट देण्याबाबत तसेच औषध बाहेरून आणण्याबाबत सांगितले जाते असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये निष्पन्न झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मध्यवर्ती शासकीय रुग्णालयास/विविध वैद्यकीय सोयी सुविधा व वैद्यकीय उपकरणांसाठी महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या वैद्यकीय आरोग्य खात्याकडून वेळोवेळी करोडो रुपयांचा निधी मिळत असतानाही त्याचा गैरवापर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालय प्रशासन व रुग्णामधील समन्वयासाठी तसेच रुग्णालय कामकाज देखरेखीसाठी स्थानिक आमदारांचे अध्यक्षतेखाली गठीत कमिटीचे पुनर्गठन अद्याप रुग्णालय प्रशासनातर्फे झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनामार्फत चौकशी अंती कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अभ्यागत मंडळाची पुनर्रचना करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्हयात ठिंबक तुषार सिंचन अनुदानासाठी सहा हजार प्रस्ताव आल्याबाबत

**(४६) १४३४९ (०८-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात ठिंबक तुषार सिंचन अनुदानासाठी सहा हजार प्रस्ताव आले असता त्यातील चार हजार ७०० प्रस्तावाची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली आहे व १३०० प्रस्तावाची नोंदणी करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासन ठिबक, तुषार सिंचनाचे क्षेत्र वाढविण्याचा निर्णय घेत असतांना सातारा जिल्हयात १३०० अर्जाची नोंद न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सातारा जिल्हयासह राज्यात ठिंबक, तुषार सिंचनाचे क्षेत्र वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१५) :**(१) होय. हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०१२-१३ मध्ये प्रलंबित प्रस्तावांकरीता जुलै, २०१४ अखेर ठेवलेल्या ई-ठिबक आज्ञावलीत १३०० शेतकरी अर्ज भरु शकले नाहीत त्यामुळे त्यांची नोंद झाली नाही.

शेतकरी हिताचा विचार करुन एन.आय.सी.मार्फत ई-ठिबक सुविधा उपलब्ध करुन देऊन सदर १३०० शेतक-यांचे अर्ज स्विकारण्यात आले.

सातारा जिल्हयासह राज्यात सुक्ष्म सिंचनाचे क्षेत्र वाढविण्याकरीता वृत्तपत्र, शेतकरी मेळावे, चर्चासत्रे आकाशवाणी व दूरध्वनीवरुन तज्ञांच्या मुलाखतीव्दारे सुक्ष्म सिंचनाबद्दल शेतक-यांमध्ये जागृती केली जात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थान व्यवस्थापन समितीबाबत**

**(४७) १४३५२ (०८-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थान व्यवस्थापन समिती शासनाच्या ताब्यात असतांना अंबाबाई आणि जोतिबा मंदिर वगळता अन्य मंदिराचे लेखा परिक्षण सहा वर्षापासून करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच पश्चिम महाराष्ट्रातील मंदिरचे लेखापरिक्षण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) सन २०१३-१४ अखेरचे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या व्यवस्थापन निधी (management fund) चे लेखापरीक्षण पूर्ण करुन अहवाल सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोल्हापूर कार्यालयाने जा.क्र.स्था. १८/ब/देव्यस/लेपअ/को/८९३ दिनांक १०-१०-२०१४ रोजी निर्गमित केलेला आहे.

अंबाबाई व जोतिबा मंदिर वगळता अन्य सर्व मंदिरांचे लेखापरीक्षण झालेले नाही. जोतिबा व अंबाबाई मंदिरां खेरीज अन्य मंदिरे ही संपूर्ण ग्रामिण भागात असुन त्यांची थेट व्यवस्था पाहणेसाठी देवस्थानसमितीकडे पुरेशी व व्यापक यंत्रणा नसल्याने मंदिरांसाठी स्थानिक व्यवस्था पाहणेसाठी मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० कलम ५६ के नुसार स्थानिक उपसमित्या नियुक्त केल्या जातात. त्या उपसमिती मार्फत मंदिर जिर्णोध्दार, उत्सव अशी कामे करणेत येतात व उपसमित्या सी.ए.मार्फत लेखापरिक्षण करुन घेत असतात. देवस्थान समितीचे सन २००७/०८ ते २०११/१२ अखेरचे लेखापरीक्षण करणे करीता शासनाने क्र.डीएमसी २०१२/प्र.क्र.४४/१२/का.सोळा दिनांक १७/१०/२०१२ चे आदेशाने मे.कोचर ॲण्ड असोसिएट्स, मुंबई यांची नियुक्ती केली असून त्यांचे मार्फत लेखापरीक्षण सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आकुर्डे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथे मिनी एम.आय.डी.सी. मंजूर झाल्याबाबत**

**(४८) १४३६३ (१०-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकुर्डे (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथे मिनी एम.आय.डी.सी. मंजूर झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने सदरची एम.आय.डी.सी. च्या कामास अद्यापही सुरूवात केलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा एम.आय.डी.सी. प्रकल्प लवकर सुरू करण्यासाठी राज्य शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आकुर्डे मिनी औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासाठी चार गावांतील एकूण ५२.८२ हे आर इतके खाजगी क्षेत्र अधिसूचित करण्यात आले असून केंद्र शासनाच्या नविन भूसंपादन कायदा, २०१३ नुसार नुकसान भरपाईचे दर ठरविण्यासाठी तसेच भूसंपादनाची भूमिका संबंधितांना समजून सांगण्यासाठी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यासोबत संबंधित खातेदारांची बैठक आयोजित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगरुळपीर (जि.वाशिम) येथील म.ग्रा.रोहयो अंतर्गत सिंचन विहिरीचे कामाचे हजेरी पत्रकाबाबत**

**(४९) १४३७१ (०८-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळपीर जि.वाशिम येथील सन २०१२-१३ पासूनचे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अंतर्गत सिंचन विहिरींचे मंजूराचे हजेरीपत्रक अनेक महिन्यापासून कॉम्प्यूटरवर ऑनलाईन करणे बंद आहे, तसेच कुशल व अकुशल चे हजेरीपत्रक ऑनलाईन करणे अनेक दिवसापासून बंद आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंचन विहिरीचे मजुरांचे व साहित्याचे पैसे देण्यास वेळ होत आहे याला जबाबदार असणा-या अधिकारी APO यांचेवर शासनाने चाैकशी करुन काय कार्यवाही केली वा करणार आहे मजुरांचे व साहित्याचे पैसे केव्हा मिळणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०१५) :**(१) व (२) हे अशंत: खरे आहे.

महात्मा गांधी नरेगा अंतर्गत पंचायत समिती मंगरुळपीर मध्ये सिंचन विहिरींची सन २०१२-१३ पासून ३३५९ हजेरीपत्रक ग्रामपंचायत कडून आलेल्या मागणीनुसार देण्यात आलेली आहेत. तसेच सिंचन विहिरींच्या कामाची सन २०१२-१३ पासून कुशल रक्कम १२४.४९ लक्ष व

अकुशल रक्कम ४२२.७३ लक्ष एवढी रक्कम सिंचन विहिरींच्या कामावर खर्च करण्यात आली आहे. सिंचन विहिरीचे हजेरीपत्रक ऑन लाईन करणे तसेच सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील १९ लक्ष एवढी रक्कम सामाजिक अंकेक्षणा अभावी प्रलंबित आहे. सद्यस्थितीत पंचायत समिती मंगरुळपीर मध्ये सिंचन विहिरींच्या कामाचे हजेरीपत्रक नियमित करण्याची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील श्री.तुंगारेश्वर मंदीराचापर्यटनाच्या दृष्टीने विकास करणेबाबत**

**(५०) १४४२२ (०७-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील प्रसिध्द पुरातन श्री.तुंगारेश्वर मंदीराचा समावेश राज्य शासनाने २००२ मध्ये 'क' पर्यटन स्थळाचा दर्जा जाहीर करुनही अद्यापपर्यंत या स्थळाचा पर्यटनाच्या दृष्टीने योग्य त्या प्रमाणात विकास झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुंगारेश्वर पायथ्यापासून मंदीरापर्यंत जाणारा ३ कि.मी. रस्ता अद्यापही कच्चा असून स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नसणे इ. तक्रारी असुन यासंबधी कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) तसेच, तुंगारेश्वर पर्यटन स्थळी कायमस्वरुपी वीजपुरवठा सुरु करण्याबाबत महावितरणकडून कोणती उपायोजना करण्यात येत आहे,

(४) सदर पर्यटन स्थळाचा विकास करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५)** :(१) ते (२) श्री क्षेत्र तुंगारेश्वर या स्थळास "क" वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला आहे. तथापि सदर क्षेत्र वन विभागाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे वन विभाग, जिल्हाधिकारी, ठाणे व पर्यटन विभाग यांची एकत्र बैठक घेऊन प्रस्ताव तयार करण्यात यावा असे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने दि.१३.२.२०१४ रोजी तत्कालीन मा.मंत्री, राज्य उत्पादन शुल्क तथा पालक मंत्री, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली असून मा.मंत्री यांनी असे सूचित केले की, वन विभागाने जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव सादर करावा, तद्नंतर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत प्रस्तावाबाबत चर्चा होऊन तो पर्यटन विभागास सादर करण्याबाबत किंवा प्रस्तावास वन अधिनियम १९८० अंतर्गत आवश्यक परवानगी घेण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. त्यानुसार सदर प्रस्ताव अद्यापि पर्यटन विभागाकडे प्राप्त झालेला नाही.

(३) महावितरण कंपनीने तुंगारेश्वर पर्यटनस्थळी कायमस्वरुपी वीज पुरवठा करण्याकामी २०० केव्हीके क्षमतेचा रोहीत्र उभारण्याचे व ३ किमी भूमीगत केबल करण्याचे काम आय.पी.डी.एस. योजनेअंतर्गत समाविष्ट केलेले असून सदर योजना मंजूरीच्या प्रतिक्षेत आहे. सदर ठिकाणी वन विभागाकडून रोहीत्र बनविण्यासाठी तसेच भूमिगत उच्च दाब वाहिनी टाकण्यासाठी परवानगी मिळाल्यास आय.पी.डी.एस. योजनेतंर्गत रोहीत्र बसवून कायमस्वरुपी विद्युत पुरवठा करता येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.